Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 801 – 809
DOI: 10.5281/zenodo.10280093

Original Research Article

# महात्मा गांधीजींची रचनात्मक कार्यक्रमाची संकल्पना: एक अभ्यास

प्रा. डॉ. जायेवार जे. एल.

विभाग प्रमुख, इतिहास विभाग, संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, ता. जळकोट जि. लातुर ४१३५३२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: jayewarjagdish.jj@gmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

**सारांश**

संपुर्ण जगामध्ये जी महामानवे जन्मास आली त्यांनी संपुर्ण जगाचा उध्दार घडवून आनला. त्यांच्या कार्यामुळे संपूर्ण मानव जातीचे कल्याण घडून आले. अशापैकी एक महात्मा गाधी आहेत. भारत भुमीमध्ये महात्मा एक राष्ट्रपीता, तत्वचिंतक, समाज सुधारक, राजकीय चिंतक, इतिहास तज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, महामानव, शांतीचे दूत अशा विविध रूपामध्ये महात्मा गांधी यांना आपण पाहतो. महात्मा गांधी यांनी आपल्या संपूर्ण जीवनामध्ये संपूर्ण मानवासाठी अतिशय मोलाचे कार्य केलेली आहेत. त्यांनी विविध स्वरूपामध्ये जी कार्य केलेली आहेत त्यामुळे त्यांनी भारतातील नव्हे तर जगातील मानवाचे कल्याण घडवून आले आहे. प्रस्तूत शोध निबंधात महात्मा गांधीजीच्या रचनात्मक कार्यक्रमांची माहितीसह त्यांचे जगातील मानव जातीवर झालेले परिणाम स्पष्ट केले आहे. माहत्मा गांधीजींचा रचनात्मक कार्यक्रम स्वराज्याचा क्रांतीकार्यक्रम कसा बनला त्यातून स्वराज्य संपादन करण्यास व राष्ट्र पुनर स्थापनासाठी कसे प्रेरक ठरले याचा आढावा घेण्यात आला.

**प्रस्तावना**

रचनात्मक कार्यक्रम स्वराज्याचे केवळ तंत्र नाही तर स्वराज्याचा आत्मा आहे. कारण रचनात्मक कार्यक्रमाची व्यवस्थित अंमलबजावणी केल्यास व्यक्ती व राष्ट्राचा बाह्य व आंतरिक अशा दोन्ही अंगांनी विकास होतो. सत्य, अहिंसा व शुद्ध साधनांनी स्वराज्य संपादनाचा रचनात्मक कार्यक्रम हा एक क्रांतिकारक व युगप्रवर्तक कार्यक्रम आहे. यातून साकार होणारे स्वराज्य दंडनीतीवर आधारलेले नसते तर ते नैतिक बळावर आधारलेले असते. हिंसात्मक साधनांनी स्वराज्य

संपादन केल्यास युद्ध वा संघर्ष उद्भवण्याची शक्यता असते. कोणतेही युद्ध मानवजातीस हानिकारक असते. युद्धांमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात मानवसंहार होतो. वैयक्तिक व राष्ट्रीय संपत्तीची हानी होते. पण त्यापेक्षाही जास्त धोकादायक बाब म्हणजे हिंसाचारातून मिळालेले स्वराज्य मूठभर धनिक व सत्ताधारांचे लोकांना लाभदायक असते. अशा स्वराज्याचा सामान्य जनांना लाभ होत नाही. स्वराज्याचा सामान्यातल्या सामान्य व्यक्तीला लाभ करून द्यावयाचा असेल तर, ते रचनात्मक कार्यक्रमांद्वारे मिळविले पाहिजे, असे म.गांधी प्रतिपादन करतात.

महात्मा गांधीजींचा रचनात्मक कार्यक्रम व्यापक तत्त्वावर आधारलेला आहे, समाजातील वेगवेगळया हितसंबंधाच्या व्यक्ती वा समाजगटाच्या हितसंबंधांचे संरक्षण केले पाहिजे. समाजातील कोणत्याही व्यक्ती वा गटाच्या हितसंबंधाकडे दुर्लक्ष होऊ नये. समाजाचा समतोल पद्धतीने विकास व्हावा. व्यक्ती वा समाजजीवनाचा केवळ भौतिक नव्हे तर नैतिक अंगाने देखील विकास व्हावा. समाजातील व्यक्ती-व्यक्तींत व गटागटात प्रेम व बंधुत्वभाव असावा. समाजातील दुर्बलातल्या दुर्बल व्यक्तीलादेखील विकासाची संधी उपलब्ध व्हावी. त्यांचा हा कार्यक्रम म्हणजे या तत्त्व वा मूल्यांचा मूर्त आविष्कार आहे.

या कार्यक्रमातून समाजातील विविध सामाजिक दोष या दुरितांचे निराकरण व्हावे, अशी त्यांची अपेक्षा आहे. शतकानुशतके आपल्या समाजात दारिद्र्य, अज्ञान, विषमता, मानसिक, सामाजिक आणि सांस्कृतिक गुलामगिरी आदी सामाजिक दोष अस्तित्वात आहेत. संकुचित विचार वा समाजाच्या अयोग्य नियोजन व नियमनामुळे हे दोष निर्माण झालेले आहेत. काही प्रसंगी व्यक्तीच्या वासनादेखील यांना कारणीभूत असतात. महात्मा गांधींनी हे नेमकेपणाने ओळखले होते. समाजातून दोष घालविल्याशिवाय चांगला समाज निर्माण करता येत नाही, हे त्यांच्या लक्षात आले. म्हणून त्यांनी रचनात्मक कार्यक्रमातून सामाजिक दोष घालविता येतील, असे प्रतिपादन केले.

त्यांनी रचनात्मक कार्यक्रमाची कल्पना रचनात्मक कार्यक्रम या छोट्या आणि पुस्तिकेत मांडलेली आहे. त्यांनी ही पंचवीस पानांची पुस्तिका १९४१ साली सेवाग्राम ते बार्डोली या रेल्वे प्रवासात लिहिली. त्यांनी १९४५ मध्ये कस्तुरबा निधीच्या कार्यकर्त्यांसमोर भाषण दिल्यानंतर या पुस्तिकेचे पुनर्लेखन केले. यात त्यांनी रचनात्मक कार्यक्रमाची एकूण अठरा कलमे सांगितलेली आहेत.

हा कार्यक्रम म्हणजे आपले विविध कठीण प्रश्न सोडविण्याचा सोपा मार्ग आहे. त्यांच्या दृष्टीने पूर्ण स्वराज्य याशिवाय शक्य नाही. यामुळे त्यांनी या कार्यक्रमाला सर्वांत अधिक महत्त्व दिले. ते म्हणत, रचनात्मक कार्यक्रम राजकीय कायपिक्षा शंभर पटीने प्रिय आहे." परंतु दुर्दैवाने हिंद- स्वराज्य या त्यांच्या पुस्तकाखालोखाल महत्व असलेल्या रचनात्मक कार्यक्रम या पुस्तकाकडे देशातील विचारवंत, राजकीय कार्यकर्ते व सामाजिक कार्यकर्त्यांनी गांभीर्याने लक्ष दिले नाही. याकडे लक्ष दिले असते तर, आज भारताचे चित्र वेगळे दिसले असते. म.गांधींनी 'रचनात्मक कार्यक्रम या पुस्तिकेत खालील एकूण अठरा कलमे वा कार्यक्रम सांगितले आहेत. कार्यक्रमातील कलमे खालीलप्रमाणे आहेत.

१. जातीय ऐक्य

२. अस्पृश्यता निवारण

३. दारूबंदी

४. खादी

५. ग्रामोद्योग

६. ग्राम सफाई

७. नई तालीम

८. प्रौढ शिक्षण

९. स्त्रिया

१०. आरोग्य व स्वच्छतेच्या नियमांचे शिक्षण

११. प्रांतिक भाषा

१२. राष्ट्रभाषा

१३. आर्थिक समता

१४. शेतकरी

१५. कामगार

१६. आदिवासी

१७. महारोगी

१८. विद्यार्थी

**उद्देष**

१. म. गांधीजींच्या रचनात्मक कार्यक्रमाचा आढावा घेणे.

२. रचनात्मक कार्यक्रमाचा भारत आणि जागतील मानवजातीवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तूत संशोधनासाठ द्वितीयक साधन सामुग्रीचा आधार घेण्यात आला.

**रचनात्मक कार्यक्रम**

**१. जातीय ऐक्य**

म. गांधीजी म्हणतात, स्वराज्यासाठी विविध धर्म व जातींतील व्यक्तींमध्ये ऐक्यभावना असणे आवश्यक आहे. यामुळे त्यांनी रचनात्मक कार्यक्रमात श्जातीय ऐक्याला प्रथम स्थान दिले आहे. कोणत्याही देशात राजकीय ऐक्य बाहेरून

लादून निर्माण होत नाही. त्यासाठी वेगवेगळया धर्म व जातींतील व्यक्तींमध्ये परस्परांविषयी प्रेमभावना व आस्था निर्माण करावी लागते. म्हणून कार्यकर्त्यांनी अवघड असलेले हे काम प्रयत्नपूर्वक केले पाहिजे, असे त्यांचे मत होते.

**२. अस्पृष्यता निवारण**

त्यांनी रचनात्मक कार्यक्रमात अस्पृश्यता निवारणास दुसरे स्थान दिलेले आहे. कारण या प्रश्नाचे गांभीर्य त्यांच्या लक्षात आलेले होते. त्यांच्या मते अस्पृश्यता ही राष्ट्रीय आणि सामाजिक ऐक्यातील अडसर आहे. त्यांच्या दृष्टीने अस्पृश्यता निवारण हे स्वराज्याच्या इमारत उभारणीच्या कार्याचा एक भाग आहे. हे काम अवघड आहे. अस्पृश्यता निवारणाचा मार्ग अगदी उंचावरचा, चढणीचा आणि अरुंद मार्ग आहे. त्यात पुष्कळ घसरगुंडीच्या चढणी आहेत. पण हा मार्ग न डगमगता स्थिर पावले टाकून पूर्ण केल्यावरच स्वराज्याच्या शिखरापर्यंत आपणास जाता येईल.

**३. दारूबंदी**

महात्मा गांधी दारूबंदीचा पुरस्कार करणारे भारतातील एकमेव राजकीय नेते व विचारवंत होते. ते जवळ-जवळ तीन दशके या प्रश्नासंबंधी सखोल व सविस्तर विचार मांडत होते. त्यांची अशी धारणाच होती की, देशाच्या, सामाजिक, आर्थिक आणि नैतिक विकासासाठी दारूबंदी आवश्यक आहे. विधायक कार्यक्रम हा त्यांच्या स्वातंत्र्य आंदोलनाचा पाया होता. म्हणून त्यांनी १९४२ साली मांडलेल्या अठरा कलमी कार्यक्रमात दारूबंदीचा तिसर्या क्रमांकावर समावेश केलेला होता. दारूबंदीचा कॉंग्रेसच्या कार्यक्रमात १९२० पासून समावेश होता. परंतु त्यांची अशी तक्रार होती की, कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी या जिव्हाळयाच्या सामाजिक व नैतिक सुधारणेच्या कार्याकडे म्हणावे तेवढे लक्ष दिले नाही. त्यांची अशी तीव्र इच्छा होती की, कार्यकर्त्यांनी तातडीने हा कार्यक्रम हाती घ्यावा. यामुळेच त्यांनी १९२२ मध्ये देशासमोर जो चतुःसूत्री कार्यक्रम मांडला. त्यात खादी, हरिजन सेवा व हिंदू, मुस्लिम ऐक्य याबरोबर दारूबंदीचाही समावेश केलेला होता. यावरून ते दारूबंदीचा सतत पाठपुरावा करीत होते हे स्पष्ट होते.

**४. खादी**

म. गांधींनी रचनात्मक कार्यक्रमात खादीला फार महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. कारण त्यांच्या मते खादी ही देशातील लोकांच्या स्वातंत्र, समता आणि ऐक्याचे प्रतीक आहे. खादी म्हणजे सर्वव्यापी स्वदेशी मनोवृत्ती होय. देशातील लोकांच्या सर्व गरजा देशातील आणि विशेषतः खेड्यांतील लोकांच्या श्रम आणि बुद्धीचा उपयोग करून मागविण्याचा हा कृतनिश्चय होय. हा कृतनिश्चय आपण प्रत्यक्षात आणला तर, आपण अनेक आर्थिक, सामाजिक व नैतिक समस्या सोडवू शकू, असे ते प्रतिपादन करतात.

**५. इतर ग्रामोद्योग**

म.गांधींनी खादीला जोडून इतर ग्रामोद्योगांचा रचनात्मक कार्यक्रमामध्ये समावेश केलेला आहे. कारण ग्रामोद्योगाशिवाय खर्या अर्थाने खेड्यांचा विकास होणार नाही व खेड्यांचे अर्थकारण सबल होणार नाही, असे त्यांचे मत

होते. जुने ते सोने या दृष्टीने त्यांना ग्रामोद्योगांचे पुनरुज्जीवन करावयाचे नव्हते. या संदर्भात ते हरिजन च्या ३०/११/३४ च्या अंकात लिहितात, जुन्या पद्धतीने दळावे-कांडावे जसा मी आग्रह धरतो ते काही मी जुन्या गोष्टींचा पक्षपाती आहे म्हणून नव्हे तर, आज भारतातील कोट्यवधी खेडुतांना त्यांच्या वेळात करता येण्यासारखे दुसरे उद्योग नाहीत म्हणून मी या जुन्या पद्धतीचा प्रचार करतो यावरून ग्रामोद्योगामागचा त्यांचा हेतू स्पष्ट होतो.

**६. ग्रामसफाई**

म.गांधीजींच्या मते आपण खेड्यांकडे अक्षम्य दुर्लक्ष केलेले आहे. याला कारण म्हणजे आपण बुद्धी आणि श्रम यांत केलेली फारकत होय. यामुळे आपल्या देशातील खेडी उकिरडे बनली आहेत. निसर्गाच्या सान्निध्यात वसलेल्या सुंदर खेड्यांत सर्वत्र घाण व दुर्गंधीचे साम्राज्य पसरलेले आहे. त्यामुळे आज खेड्यांत गेल्यावर आपले मन प्रसन्न व प्रफुल्लित होत नाही. म्हणून कार्यकर्त्यांनी खेड्यात जाऊन तेथील लोकांमध्ये वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व व आवश्यकता समजावून सांगितली पाहिजे. सार्वजनिक स्वच्छता हा सद्गुण आहे, हे त्यांच्या मनावर बिंबविले पाहिजे. त्यांनी सर्वप्रकारच्या स्वच्छतेचे आदर्श नमुने स्वतःच्या आचरणातून व प्रयत्नांतून लोकांसमोर ठेवले पाहिजेत.

**७. नई तालिम ( शिक्षणासंबंधी कार्यक्रम)**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे शिक्षणासंबंधीचे विचार क्रांतिकारक, मूलभूत आणि उपयुक्त आहेत. ते प्रचलित वर्ण-वर्ग प्रभावित शिक्षणव्यवस्था क्षीण करण्यास व व्यक्तीच्या बुद्धी, सृजनशीलता व कल्पनाशक्ती या मानसिक शक्तींचा विकास करण्यास उपयुक्त आहेत. ते लोकोपयोगी श्रमाला चालना देणारे व प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे आहेत. व्यक्ती व समाजाचे चारित्र्य घडविण्यास उपयुक्त असलेले हे विचार व्यक्तीमध्ये कर्तव्यनिष्ठा व सेवावृत्ती रुजविण्यास सक्षम आहेत. आपल्या समाजाचे वास्तव लक्षात घेऊन मांडलेले हे विचार सामाजिक स्थैर्यास आणि सामाजिक धारणेस मार्गदर्शक आहेत. म्हणून त्यांचे शिक्षणासंबंधीचे विचार व्यवस्थित व गांभीर्याने समजून घेणे आवश्यक आहे.

**८. प्रौढशिक्षण**

म. गांधीजींनी प्रौढ शिक्षणासंबंधी विचार मांडून निरक्षरता या गंभीर सामाजिक प्रश्नाकडे आपले लक्ष वेधण्याचे महत्त्वाचे कार्य केलेले आहे. समाजातील निम्यापेक्षा जास्त लोकांना निरक्षर ठेवून सामाजिक परिवर्तनाचा विचार करणे निरर्थक ठरले. सर्वसामान्य उपेक्षित व गरीब माणसांना शिक्षणाच्या प्रवाहात सहभागी करून घेतले पाहिजे, हा त्यांचा विचार मोलाचा आहे. त्यांना याद्वारे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या शूद्रातिशूद्र व स्त्रियांना शिक्षणाची संधी नाकारणारी प्रचलित समाजव्यवस्था क्षीण करावयाची होती. जीवनोपयोगी शिक्षण मग ते कोणत्याही स्तरावरील असो वा कोणासाठीही असो, हे खरे शिक्षण असते हा त्यांचा विचार या क्षेत्रात काम करणार्यांना मार्गदर्शक आहे. या कार्यक्रमाचा वापर सामाजिक व राजकीय चळवळीसाठी करुन घेतला पाहिजे, हा त्यांचा दृष्टिकोन नीट समजून घेतल्यास शिक्षणाचा चळवळीसाठी वापर करून घेता येईल. त्यांच्या विचारांप्रमाणे प्रौढ शिक्षण राबविल्यास निश्चित लाभ होईल. आज

राज्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, प्रशासक आणि शिक्षणतज्ज्ञ यांनी निरक्षरता निर्मूलनाच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची व त्यांची बांधिलकीच्या जाणिवेने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे.

**९. स्त्रियांचे शिक्षण**

त्यांच्या मते समाजात स्त्री व पुरुषांना समान दर्जा असला पाहिजे. त्यांनी परस्परांना सहकार्य केले पाहिजे. स्त्रिया पुरुषांच्या तुलनेने चातुर्य व कर्तृत्व यात कोठेही कमी नसतात. स्त्रिया शरीरसामर्थ्यात कमी असल्यातरी, त्या नैतिक बलाच्या बाबतीत पुरुषांपेक्षा श्रेष्ठ आहेत. त्यांच्यात अहिंसावृत्ती असते. अहिंसा म्हणजे अगाध प्रेम व क्लेश सहन करण्याची अपार शक्ती. ही शक्ती आईशिवाय अन्यत्र कुठे आढळत नाही. निःस्वार्थ सेवाभाव हा स्त्रियांचा निसर्गदत्त गुण आहे. त्या करुणेचा आविष्कार असतात. आत्मबलिदानाची, नम्रतेची, श्रद्धेची आणि शांततेची प्रतीक म्हणजे लिया होत. त्या धैर्यवान असतात. त्यांच्यात बुद्धी उपजतरीत्या तीव्र असते. म्हणून स्त्रिया या पुरुषांच्या तुलनेत कोठेही कमी नसतात. यास्तव ते पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही हक्क व एक स्वातंत्र्य दिले पाहिजे, असे प्रतिपादन करतात. त्यांच्या मते स्त्री-पुरुषांचा दर्जा एक आहे पण ते एकरूप नाहीत. ते एकमेकांना इतके पूरक आहेत की, ते एकमेकांशिवाय जीवन जगू शकत नाहीत. त्यांपैकी कोणाचेही स्थान भ्रष्ट झाले की, दोघेही गडगडणार. यामुळे पुरुषांनी स्त्रियांना आपले मित्र व सहकारी मानले पाहिजे. आपण स्त्रियांचे प्रभु वा मालक आहोत, असे पुरुषांनी मानता कामा नये.

**१०. आरोग्य व स्वच्छतेचे षिक्षण**

म.गांधींनी आरोग्य व स्वच्छतेचे शिक्षण यांचा ग्रामसफाईत समावेश न करता स्वतंत्र कार्यक्रम सांगितलेला आहे. कारण त्यांची वेगवेगळया कार्यक्रमांत ढवळाढवळ करण्याची इच्छा नाही. त्यांच्या मते प्रत्येक कार्यक्रमाला वेगळा संदर्भ व महत्त्व आहे. आरोग्य व स्वच्छतेचे शिक्षण हा ग्रामसफाईपेक्षा वेगळा कार्यक्रम आहे. असे त्यांचे मत आहे.

प्रत्येकाने स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे ही एक कला आहे. प्रत्येक व्यक्तीने ही कला अवगत केली पाहिजे. आरोग्याचे व स्वच्छतेचे ज्ञान संपादन करणे, व त्यानुसार वागणे हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे, असे त्यांना वाटते.

**११. प्रांतीय भाशा**

म.गांधीजींच्या मते स्वराज्यासाठी प्रांतीय भाषांचा विकास होणे आवश्यक आहे. प्रांतीय भाषांचा विकास झाला तर, राजकीय दृष्ट्या जागृत असलेल्या सुशिक्षित व्यक्ती व सर्वसामान्य जनतेत निर्माण झालेले अंतर कमी होते. यामुळे त्यांच्यात संवाद सुरू होतो. प्रांतीय भाषांचा विकास झाला नाही तर या भाषांमध्ये शास्त्रीय संज्ञांचा विकास होणार नाही. प्रांतीय भाषांमध्ये शास्त्रीय संज्ञा विकसित नाही झाल्या तर, सर्वसामान्य व्यक्ती नवीन ज्ञान व विचारांपासून वंचित राहतील. सर्वसामान्य व्यक्ती नवीन ज्ञान व विचारांपासून वंचित राहिल्यास ते अज्ञानी राहतील व विविध बंधनांत बंदिस्त होतील. बंधनांत बंदिस्त झालेल्या व्यक्ती स्वराज्याच्या उभारणीत सहभागी होऊ शकणार नाहीत. सर्वसामान्यांना त्यांच्या मातृभाषेत स्वराज्याचे प्रत्येक पाऊल व रहस्य समजावून सांगितल्याशिवाय सर्वसामान्यांना

स्वराज्य उभारणीत त्यांना सहभागी करून घेता येणार नाही. यामुळे प्रांतीय भाषा समृद्ध करणे आवश्यक आहे, असे त्यांना वाटते.

**१२. राष्ट्रभाषा**

म. गांधीजींच्या मते संपूर्ण देशासाठी एक राष्ट्रभाषा असली पाहिजे. राष्ट्रभाषेमुळे देशांतील सर्व लोकांत विचार व भावनांचे व्यवस्थित संप्रेषण होऊ शकते. देशातील सर्व स्तरातील व्यक्तींना स्वराज्याचा उपभोग घेण्यासाठी राष्ट्रभाषा आवश्यक आहे. देश वा समाजातील व्यवहार मूठभरांना अवगत असलेल्या भाषेतून चालत असतील तर स्वराज्याचा लाभ उच्च विभूषित मूठभरांना होईल व बहुसंख्य व्यक्ती स्वराज्याच्या लाभापासून वंचित राहतील. यामुळे त्यांनी देशात एक राष्ट्रभाषा असावी या मताचा हिरिरीने पुरस्कार केला.

**१३. आर्थिक समता**

म. गांधीजींच्या मते आर्थिक समता ही स्वराज्याची गुरुकिल्ली आहे. समाजात आर्थिक समता प्रस्थापित झाल्याशिवाय सर्वसामान्य व्यक्तीला स्वराज्याचा उपभोग घेता येणार नाही व स्वराज्य अर्थपूर्ण होणार नाही. त्यामुळे त्यांनी आर्थिक समतेचा हेतुतरू व व्यापक पद्धतीने पुरस्कार केला.

**१४. शेतकरी**

म. गांधीजींच्या मते स्वराज्याची इमारत एक प्रचंड इमारत आहे. तिच्या उभारणीसाठी देशातील ऐंशी कोटी हातांनी काम करण्याची गरज आहे. देशातील लोकसंख्येपैकी जवळजवळ ऐंशी टक्के शेतकर्यांची संख्या आहे. परंतु दुर्दैवाने कार्यकर्त्यांनी शेतकर्याचा स्वराज्य इमारत उभारणीस म्हणावा तसा उपयोग करून घेतला नाही. त्यांच्या मते शेतकर्यांची स्थिती स्वराज्य निर्मितीतील एक निर्णायक शक्ती आहे. यासाठी शेतकर्यांना संघटित करणे, त्यांच्यावरील अन्याय निवारणासाठी आंदोलने करणे व त्यांना जागृत करणे स्वराज्यासाठी आवश्यक आहे. भारतीय समाजात जीवघेणी व क्लेशदायक विषमता आहे. याचे त्यांना भान होते. म्हणून समता प्रस्थापनेसाठी येथील विषमता नष्ट झाली पाहिजे यावर ते भर देतात.

**१५.कामगार**

मजूर आणि भांडवलदार राष्ट्रपुनरुथानाचे महत्त्वाचे घटक आहेत. भांडवलदार उद्योगांत पैशांची गुंतवणूक करतात तर, मजूर श्रमांनी उत्पादन वाढवितात. म्हणून मजूर व भांडवलदार उद्योगातील समान भागीदार आहेत. ते एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. यास्तव मजुरांच्या प्रश्नांकडे मानवी दृष्टीने लक्ष देणे आवश्यक आहे. कारण मजुरांच्या श्रमांतूनच उद्योगधंद्यातील उत्पादन वाढते. या उत्पन्नामुळे राष्ट्राचा विकास होत असतो. परंतु मजुराकडे दुर्लक्ष झाले वा त्यांच्या समस्या नाही सोडविल्या तर त्यांच्यात असंतोष निर्माण होतो. त्यांच्यातील असंतोषामुळे संघर्ष निर्माण होऊ

शकतो. मजुरांतील असंतोष राष्ट्राच्या विकास वा प्रगतीतील गतिरोधक बनू शकतो. यामुळे भांडवलदारांनी व शासनाने त्यांच्यात असंतोष वाढणार नाही वा वाढलेला असंतोष कमी करण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत.

**१६. आदिवासी लोक**

म. गांधीजींच्या मते आदिवासी लोकांची सेवा हीदेखील विधायक कार्यक्रमाचे एक अंग आहे. रचनात्मक कार्यक्रमात त्यांचा अनुक्रम सोळावा असलातरी, त्याचे महत्त्व जरादेखील कमी नाही. त्यांच्या मते भारतात आदिवासी लोकांची संख्या दोन कोटींपेक्षा जास्त आहे. आदिवासी सर्व सोयींपासून वंचित आहेत. यामुळे त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. परंतु या व्यापक कार्यासाठी कार्यकर्ते अपुरे आहेत. आदिवासी लोकांत जाऊन त्यांच्या विकासासाठी कार्य करणारे कार्यकर्ते तयार करणे गरजेचे आहे. कार्यकर्त्यांना आदिवासी लोकांत, केवळ माणुसकीच्या भावनेने नव्हे तर, ते स्वराज्यासाठी आवश्यक म्हणून काम केले पाहिजे.

**१७.महारोगी**

म. गांधीजींच्या मते स्वराज्याचा लाभ समाजातील उपेक्षित व दुर्लक्षित घटकदेखील झाला पाहिजे. म्हणून त्यांनी महारोग्यांची सेवा याचा रचनात्मक कार्यक्रमात समावेश केला. जगामध्ये अफ्रिकेनंतर भारतामध्ये महारोग्यांची संख्या जास्त आहे. असे असतानाही भारतातील कार्यकर्त्यांनी महारोग्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले आहे, अशी त्यांची तक्रार आहे. आपली सत्य आणि अहिंसा वावर श्रद्धा असती आणि कमी वेळेत स्वराज्यप्राप्तीची आपली तळमळ असती तर, आपण या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले नसते. त्यांच्या मते महारोग्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी आपण या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे.

**१८. विद्यार्थी**

म. गांधीजींच्या मते विद्यार्थी आणि युवक यांचा देशाच्या भविष्यात व विकासात मुख्य आधार असतो. त्यांच्यातून देशाचे नेतृत्व निर्माण होत असते. म्हणून त्यांनी रचनात्मक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशाच्या उभारणीत व स्वराज्य अर्थपूर्ण करण्यासाठी कोणत्या दिशेने कार्य करावे याचे विवेचन केलेले आहे. म. गांधी सतत विद्यार्थ्यांच्या संपर्कात राहत. देशातील विविध भागांतील विद्यार्थी त्यांना त्यांच्या अडचणी व प्रश्न मनमोकळेपणाने सांगत. मार्गदर्शन करण्यासाठी विनंती करीत. तेदेखील मुद्दाम कार्यबाहुल्यातून वेळ काढून कधी प्रत्यक्ष श्भाषणातून तर कधी 'हरिजन' व 'यंग इंडिया' त लिहून त्यांना मार्गदर्शन करीत. या संपर्कामुळे त्यांना विद्यार्थ्यांना भावना व विचारांचा पूर्ण परिचय होता. विद्यार्थ्यांनी निर्भयपणे देशातील असहकार चळवळ आणि अन्य राष्ट्रीय कार्यातील सहभागाचा स्वतः त्यांना व राष्ट्राला पुष्कळ लाभ झाला होता. यामुळे कार्यकर्त्यांनी विद्यार्थ्याकडे लक्ष दिले पाहिजे, असे प्रतिपादन करतात.

**समारोप**

म. गांधींनी या कार्यक्रमात अत्यंत विचारपूर्वक प्रत्येक प्रश्नाची निवड केलेली आहे. म. गांधी कृतिशील विचारवंत आहेत. म्हणून ते अन्य विचारवंतांप्रमाणे केवळ प्रश्नच उपस्थित करीत नाहीत तर ते आपल्या मूलभूत प्रश्नांवर नेमकेपणाने बोट तर ठेवतातच पण त्यासोबत ते प्रश्न सोडविण्याचे अत्यंत सोपे पण महत्त्वाचे आणि उपयुक्त असे उपायही सुचवितात. हे त्यांचे खास सामर्थ्यस्थान आहे. म. गांधीजींच्या अपेक्षेप्रमाणे या कार्यक्रमाची अंमलबजावणी झाली तर समाजातील सर्व स्तरांतील आणि अत्यंत शेवटच्या दुबळया व्यक्तीतदेखील स्वराज्य उपभोगण्याची क्षमता व पावती निर्माण होऊ शकते. कारण त्यांचा विचार करणार्यांनी ठेवले पाहिजे. म्हणून त्यांचा हा कार्यक्रम निःशस्त्र व्यक्ती व समाजाला शक्तिमान व वैभवशाली करणारा, सामान्यांना न्याय मिळवून देणारा कार्यक्रम आहे.

**संदर्भ सुची**

१. रचनात्मक कार्यक्रम उसका रहस्य और स्थान: गांधीजी, अनुवादकः काशिनाथ त्रिवादी, 1946, नवजीवन मुद्रणालय, अहमदाबाद

२. महात्मा गांधीः डॉ. नरसिंग पी. कुडकेकर, 2017, ज्योतीचंद्र प्रकाशन, लातूर

३. गांधी-दृष्टी युवा रचनात्मकता के आयामः संपादक, प्रो. मनोजकुमार, डॉ. अमित विश्वास, रेखा बुक्स

४. रचनात्मक कार्यक्रम: विज्ञान और अध्यात्म का समन्वय, महात्मा गांधी, 2011, गांधी